2.1 JUN 2018

महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात आज योग शिबिर

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

सध्याच्या धावपळीच्या युगात प्रत्येकजण आपल्या शरीराची काळजी घेतो. अर्थात त्याचे स्वरूप कमी-अधिक प्रमाणात असू शकेल किंवा काळजी घेत असतानाही शरीराकडे लक्ष देण्यास फारसा वेळ मिळत नसेल. त्यासाठी कमी वेळात 'योगा' करून आरोग्याची काळजी घेणे शक्य आहे. याचीच महती सांगणारा आंतरराष्ट्रीय योगदिन गुरुवारी (ता. २१) साजरा होत आहे. यानिमित्त महाराष्ट्र टाइम्स, शिवाजी विद्यापीठ आणि सिद्धगिरी मठ, भागिरथी महिला




## मटासह विद्यापीठ, सिद्धगिरी मठातर्फे आयोजन

संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने योग शिबिराचे आयोजन केले आहे.

गुरुवारी सकाळी ६.३० वाजता शिवाजी विद्यापीठाच्या लोककला केंद्रात योग शिबिर होईल. आंतरराष्ट्रीय योगदिनाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या या शिबिरात 'योग' या विषयाची शास्त्रीय माहिती, योगाचे महत्त्व, फायदे याविषयी तज्ज्ञांकडून मार्गदर्शन केले जाणार आहे. योग शिबिरासाठी हेल्थ पार्टनर म्हणून मुख्य प्रायोजक अवित्रा इंटरनॅशनल प्रा. लि. चे ट्रेलीस हेयर सोल्युशन्स आहेत.

वस्तुतः शरीर, मन आणि आत्मा यांना एकत्र आणणे म्हणजे योगाभ्यास असे मानले जाते. आज वाढलेल्या धावपळीमुळे आरोग्याकडे दुर्लक्ष होऊ लागले आहे. परिणामी जीवनात तणाव, व्याधी राहू लागले आहेत. आजची बिझी लाइफस्टाइल तणावग्रस्त

- शिबिर स्थळ : शिवाजी विद्यापीठ लोककला केंद्र
- शिबिराची वेळ : सकाळी ६.३० वाजता



बनली आहे. त्यामुळेच योगाभ्यासाला अधिक महत्त्व आले असून, २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योगदिन आहे. याच दिवशी सकाळी ६.३० वाजता विद्यापीठातील लोककला केंद्रात शिबिर होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 1 JUIN 2018
सकाळ

# विविध अभ्यासक्रमांची प्रवेश फेरी लवकरच



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील अधिविभाग व संलग्नित महाविद्यालयातील विविध अभ्यासक्रमांची सुधारित गुणवत्ता यादी व प्रवेश फेरी लवकरच जाहीर केली जाणार आहे. एमए, एमएस्सी (भूगोल), एमएस्सी (सर्व विषय), एमए (सर्व विषय), एमकॉम, एलएलएम, एमसीए (सायन्स), एमएस्सी (टेक) गणित, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटचे सर्व अभ्यासक्रम, बीलिब, एमलिब, बीजेसी, एमजेजी, एमए मास कम्युनिकेशन या प्रथम वर्षाच्या अभ्यासक्रमांच्या प्रवेशाबाबतचे वेळापत्रक जाहीर केले होते; पण ते काही तांत्रिक अडचणींमुळे सुधारित केले आहे. संबंधित विद्यार्थ्यांना मोबाईलवर त्याबाबतचा संदेश पाठविला जाणार आहे. तसेच संकेतस्थळावरही यादी व प्रवेश फेरीची माहिती उपलब्ध केली जाणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 JUN 2018
तरुण भारत

# विद्यापीठ प्रवेश प्रक्रियेचे सुधारीत वेळापत्रक प्रसिद्ध

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठांतर्गत एम. ए., एम. कॉम., एल. एल. एम., एम. एस्सी. टेक., गणित आदी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षासाठीची सुधारीत प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहिर केले आहे. ते www.unishivaji.ac.in"Admissin2018" या लींकवर उपलब्ध आहे. तरी विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी बुधवारी केले आहे.


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 JUN 2018
महाराष्ट्र टाईम्स

# बीएस्सी, एमकॉम अभ्यासक्रमांना मंजुरी

इस्लामपूर : वाळवा तालुका एज्युकेशन सोसायटीच्या यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाला बीएस्सी आणि एमकॉम या दोन अभ्यासक्रमांना राज्य सरकारने मंजुरी दिली आहे. चालू शैक्षणिक वर्षात हे दोन्ही अभ्यासक्रम सुरु करणार असल्याची माहिती शिवाजी विद्यापीठाच्या मॅनेजमेंट कौन्सिलचे सदस्य अॅड. धैर्यशील पाटील यांनी दिली.

पाटील म्हणाले, 'यंदा बीएस्सी भाग एकचा वर्ग सुरू होईल. या वर्गाला ८० विद्यार्थी प्रवेश घेऊ शकतील. संस्थेच्या मालती वसंतदादा पाटील महाविद्यालयात कला शाखेतून पदव्युत्तर शिक्षणाची सोय आहे. मात्र, वाणिज्य विभागातून पदव्युत्तर शिक्षणाची सोय नव्हती.'

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 JUN 2018
लोकमत




# साहित्य भान

प्रा. रणधीर शिंदे

# पां. चि. पाटील

महाराष्ट्राच्या सामाजिक, शैक्षणिक व संस्थात्मक वाटचालीत कोल्हापूरच्या अनेक व्यक्तींनी हातभार लावला आहे. त्यापैकीच पांडुरंग चिमणाजी पाटील (१८७७-१९७८) हे एक होत. कर्तबगार शेतकी अधिकारी व समाजसुधारक अशी त्यांची ओळख आहे. शाहूवाडीजवळील वडगाव हे त्यांचे गाव. त्यांचा जन्म १९ जून १८७७ रोजी त्यांच्या आजोळी साळशी (ता. शाहूवाडी) येथे झाला. आरंभीचे शिक्षण त्यांच्या गावी, त्यानंतर राजाराम हायस्कूल, राजाराम कॉलेज व पुणे ॲग्रीकल्चर कॉलेज येथे झाले. शेतकी विषयातील महाराष्ट्रातील पहिले पीएच. डी.धारक तसेच शेती महाविद्यालयाचे पहिले भारतीय प्राचार्य अशीही त्यांची ओळख आहे. १९०६ नंतर पुणा शेतकी पुणे कॉलेजमध्ये सुपरिटेंडेंट, डिव्हिजनल इन्स्पेक्टर, कृषी महाविद्यालयात प्राध्यापक, दक्षिण महाराष्ट्र व कोकण विभागाचे डेप्युटी डायरेक्टर म्हणूनही त्यांनी काम केले. नोकरी काळात त्यांनी संशोधनासाठी युरोपचा प्रवास केला. युरोपातील व भारतीय शेती यांच्यातील तौलनिकदृष्टीने त्यांच्या अभ्यासाला नव्या दिशा मिळाल्या. निवृत्तीनंतर कोल्हापुरात स्थायिक झाले. 'पाटील साहेब शेतकी खात्याचे, शेतकी शिक्षण क्षेत्राचे व प्रयोगांचे एक ठळक असे पायाचे दगड आहेत' असे वि. द. घाटे यांनी म्हटले आणि ते खरेच आहे.



महाराष्ट्रातील शेती, जमिनीचा कस, पिके यासंबंधी त्यांनी नव्या सुधारणा सुचविल्या. पिके घेण्याच्या पद्धतीबाबत नवे प्रयोग केले. बी-बियाणे, खते, अवजारे यासंबंधी मोलाचे मार्गदर्शन केले. लोखंडी नांगर, चरक व शेती अवजारे वापरण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. गावोगावी शेती प्रदर्शने आयोजित केली. महाराष्ट्राच्या आरंभिक काळातील साखर कारखाना उभारण्यात त्यांचा मोलाचा सहभाग होता. 'शेतकी अर्थशास्त्र' विषयावर त्यांनी लेखन केले. मुंबई इलाखा व कोल्हापूर संस्थानातील शेतीविषयी त्यांनी केलेले लेखन महत्त्वाचे आहे. निवृतीनंतर कोल्हापूर रिजेन्सी कौन्सिलमध्ये त्यांनी मंत्री म्हणून शेती, शिक्षण, सहकार या क्षेत्रांत केलेले कार्यदेखील तितकेच महत्त्वाचे आहे. पुण्यातील शिवाजी मेमोरियल सोसायटी व मराठा शिक्षण परिषदेची स्थापना व उभारणीत त्यांचा मोलाचा सहभाग होता. शेतकी अधिकारी, संशोधक याबरोबरच तत्कालीन महाराष्ट्रातील समाजसुधारकाविषयी तसेच ब्रिटिश प्रशासकीय अधिकाऱ्यांशी त्यांचे जवळचे व स्नेहाचे संबंध होते. छत्रपती शाहू महाराज, तुकोजीराव होळकर, माधवराव शिंदे, भास्करराव जाधव, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील, जे. पी. नाईक यांच्याशी त्यांचे घनिष्ठ संबंध होते. या व्यक्तींची अत्यंत हृद्य अशी व्यक्तिचित्रे त्यांच्या आत्मचरित्रात आहेत. पां. चि. पाटील यांचे 'माझ्या आठवणी' (१०६४) हे आत्मचरित्र प्रसिद्ध आहे. अभिजात दर्जाचे हे आत्मचरित्र आहे. थक्क व्हावा असा स्मृतिपट त्यांनी या आत्मचरित्रात मांडला आहे. महाराष्ट्राच्या शिक्षण, राजकारण, समाजकारणाचा पट त्यामध्ये आहे. साळशी, वडगाव, पन्हाळा, कोल्हापूर, पुणे, मुंबई, खानदेश या परिसरातील समाजचित्रे या आत्मचरित्रात आहेत. काळाच्या ओघात गावे, स्थळे मनुष्य व्यवहार बदलत जातो. त्या त्या काळातील जिवंत समाज व्यवहार भविष्यात गोठून जातो. या समाजरीतीच्या वहिवाटीला या आत्मचरित्रात शब्दबद्ध केले आहे. अल्पाक्षरी, गोष्टीवेल्हाळ देशी कथनशैलीने त्यास रमणीयता प्राप्त झाली आहे. माणसांच्या खानपानासह वेशभूषेपासून वागणुकीच्या अनंत तऱ्हा त्यामधून व्यक्त झाल्या आहेत. तसेच त्या काळातील शेती समाजाचे चित्रही या ग्रंथात आहे. एकोणिसाव्या शतकाअखेरीस अत्यंत प्रतिकूल काळात उच्च दर्जाचे शिक्षण घेऊन, विविध संस्थांनात मोठ्या पदावर काम करण्याच्या संधी येऊनही संस्थांचा व व्यक्तींचा आदर ठेवून अभिमानाने त्यांनी महाराष्ट्राच्या शेती जीवनावर, समाजकारणावर वेगळा ठसा उमटविला. विसाव्या शतकाच्या पहिल्या अर्धशतकात आपल्या कर्तृत्वाचा अमोघ आणि भरघोस ठसा उमटविणाऱ्या पी. सी. पाटील यांचे त्यांच्या जन्मदिनानिमित्ताने स्मरण.

(लेखक शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागाचे प्राध्यापक आहेत)

kollokmatpratisad@gmail.com